आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२४ जानेवारी २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

1. सहकार आंदोलन आणि विज्ञान यांची सांगड घातल्यास आजही कृषिक्षेत्र लाभदायक ठरेल असा केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांचा विश्वास

2. भंडारा जिल्ह्यात आयुध निर्मिती कारखान्यात स्फोट झाल्यानं २ जणांचा मृत्यू तर ५ जण जखमी/मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता

3. वक्फ सुधारणा विधेयकाबाबतच्या संयुक्त संसदीय समितीची बैठक गदारोळामुळे स्थगित, विरोधी पक्षांच्या १० खासदारांचं

**आणि**

**4.** ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेतून नोवाक जोकोविचने माघार घेतल्याने अलेक्झांडर झ्वेरेव्ह अंतिम फेरीत दाखल

**<><><><><>**

सहकार आंदोलन आणि विज्ञान यांची सांगड घातल्यास आजही कृषिक्षेत्र लाभदायक ठरेल, असा विश्वास केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शाह यांनी व्यक्त केला आहे. शहा आज महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असून नाशिक जिल्ह्यातल्या मालेगाव तालुक्यात अजंग गावात आयोजित सहकार परिषदेला ते संबोधित करत आहेत. या कार्यक्रमाला केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री गिरीश महाजन, चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित आहेत. या परिषदेनंतर अमित शाह

नाशिक मधल्या काही कार्यक्रमांना उपस्थित राहणार असून त्यानंतर ते मुंबईला रवाना होणार आहेत. शाह यांच्या हस्ते मुंबईतल्या राष्ट्रीय नागरी सहकारी वित्त आणि विकास महामंडळाच्या कॉर्पोरेट कार्यालयाचं उद्घाटन होणार आहे. आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ निमित्तानं वर्षभरात राबवण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांच्या दिनदर्शिकेचं प्रकाशन आणि देशभर नव्यानं स्थापन झालेल्या १० हजार नवीन बहुउद्देशीय सहकारी संस्थांसाठीच्या प्रशिक्षण कार्यक्रमाची सुरुवात यावेळी करण्यात येणार आहे.

**<><><><><>**

नागपुरात आयोजित ॲडव्हान्टेज विदर्भ २०२५ या औद्योगिक महोत्सवात ५० हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार केले जाणार असल्याची माहिती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. नागपुरात आज आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. तसंच ६७० कोटी रुपयांचा मदर डेअरी चा प्रकल्प लवकरच नागपुरात सुरु होणार असल्याचं देखील त्यांनी नमूद केलं. हा महोत्सव ७ ते ९ फेब्रुवारी दरम्यान राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाच्या प्रांगणात होणार आहे. विदर्भाच्या औद्योगिक वाढीसाठी एक प्रमुख गुंतवणूक स्थळ म्हणून प्रोत्साहन देणं, बाजाराचा कल, आणि उदयोन्मुख संधींवर चर्चा केली जाणार असल्याचं गडकरी यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भंडारा जिल्ह्यात आयुध निर्मिती कारखान्यात स्फोट होऊन त्यात दोन जणांचा मृत्यू झाला आहे. तर ५ जण जखमी झाले आहेत, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. या स्फोटामुळे छत कोसळून १३ ते १४ कामगार

अडकले असल्याची शक्यता असून ५ जणांना सुरक्षित बाहेर काढण्यात आलं आहे. मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. स्फोटातल्या जखमींना भंडारा इथं रूग्णालयात दाखल केलं आहे. घटनास्थळी पोलीस आणि आरोग्य विभागामार्फत बचावकार्य सुरु आहे. तसंच एसडीआरएफ आणि नागपूर महापालिकेच्या पथकाला बचाव कार्यासाठी पाचारण करण्यात आलं आहे. स्फोटात मृत्यू झालेल्या कामगारांच्या प्रति केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी शोक व्यक्त केला आहे. या स्फोटात मृत्यू झालेल्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाज माध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**<><><><><>**

येत्या प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्लीत कर्तव्य पथावर पार पडणाऱ्या सोहळ्यासाठी आयआयटी मुंबईचे उपसंचालक मिलिंद अत्रे यांना आमंत्रित करण्यात आलं आहे. ते गेली २० वर्षं आयआयटी मुंबईत विविध विभागांमध्ये काम करत असून ते सध्या मेकॅनिकल विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्याला उपस्थितीत राहण्याची संधी दिल्याबद्दल त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत.

**होल्ड बाईट - अत्रे २६ सेकंद**

**<><><><><>**

वक्फ सुधारणा विधेयकासाठी स्थापन केलेल्या संयुक्त संसदीय समितीच्या आज नवी दिल्लीत झालेल्या बैठकीत गदारोळ झाल्याच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांच्या १० खासदारांना समितीतून निलंबित करण्यात आलं आहे. तृणमूल काँग्रेस, डीएमके, काँग्रेस आणि समाजवादी पक्षाच्या खासदारांचा यात समावेश आहे. तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांच्या विरुद्ध असंसदीय भाषा वापरल्याचा आरोप भाजपानं केला. तर बैठकीचा विषय अचानक बदलल्याचा आणि दिल्ली विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून बैठकीत मूळ मुद्द्यांचा समावेश न केल्याचा आरोप बॅनर्जी यांनी केला. या संयुक्त संसदीय समितीमध्ये लोकसभेतले २१ आणि राज्यसभेतल्या १० खासदारांचा समावेश आहे.

<><><><><>

मेलबर्न इथं सुरु असलेल्या ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरीत आज सर्बियाच्या नोवाक जोकोविचनं दुखापतीमुळे अचानक माघार घेतली.

नोवाक जोकोविच आणि जर्मनीच्या अलेक्झांडर झ्वेरेव यांच्यात झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात पहिला सेट ७-६ असा गमावल्यावर नोवाक जोकोविचनं स्पर्धेतून मध्येच माघार घेतली. स्पेनच्या कार्लोस अल्काराझसोबत झालेल्या उपांत्यपूर्व सामन्यात जोकोविचच्या गुडघ्याला दुखापत झाली होती. नोवाक जोकोविचनं या स्पर्धेचं विजेतेपद सर्वाधिक १० वेळा जिंकलं आहे.

जोकोविचनं माघार घेतल्यामुळे अलेक्झांडर इव्हेरेव अंतिम फेरीत दाखल झाला आहे. झ्वेरेव्हला आता आपलं पाहिलं ग्रँड स्लॅम पदक जिंकण्याची संधी मिळाली असून त्याचा सामना इटलीचा टेनिसपटू यानिक सिन्नर किंवा अमेरिकेचा बेन शेल्टन यांच्यातल्या विजेत्याशी होणार आहे. अंतिम सामना येत्या रविवारी होणार आहे.

महिला एकेरीचा अंतिम सामना उद्या होणार असून जागतिक क्रमवारीत अव्वल असलेली आरीना सबालेन्काचा सामना अमेरिकेच्या एकोणिसाव्या मानांकित मॅडिसन कीज सोबत होणार आहे.

**<><><><><>**

अभिनेता सैफ अली खान यांच्यावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी काल त्यांचा जबाब नोंदवला. सैफ अली खान यांनी १६ जानेवारीच्या रात्री त्यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा तपशीलवार घटनाक्रम सांगितल्याचं पोलिसांनी कळवलं आहे. त्यांच्या घरात घुसलेल्या हल्लेखोराला रोखण्याच्या प्रयत्नात त्याने सैफ अली खान यांच्यावर सहा वार केले, त्यानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आलं, असं सैफ अली खान यांनी पोलिसांना सांगितलं आहे.

**<><><><><>**

ठाणे जिल्ह्यातल्या ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या पुष्पा आगाशे यांचा काल अपघाती मृत्यू झाला. त्या ७३ वर्षांच्या होत्या. ग्राहक चळवळ, पर्यावरण संरक्षण, नेत्रदान अशा विविध क्षेत्रात त्यांनी कार्य केलं.त्यांच्या इच्छेनुसार अंतिम संस्कारापूर्वी त्यांचे नेत्रदान करण्यात आले. त्या पत्रकार आशिष

आगाशे यांच्या मातोश्री होत्या. दरम्यान या अपघाताची चौकशी पोलीस करत आहेत.

<><><><><>

महाराष्ट्रातील गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रूग्णांना महागड्या वैद्यकीय उपचारांसाठी आर्थिक मदत मिळविण्याची प्रक्रिया पूर्णतः पेपरलेस करण्यात येणार आहे. या प्रक्रियेसाठी आता मंत्रालयात येण्याची आवश्यकता राहणार नाही. याकरिता लवकरच स्वतंत्र ऑनलाइन प्रणाली विकसित करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी दिली आहे. धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष ऑनलाईन प्रणाली (चॅरिटी पोर्टल) आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष ऑनलाईन प्रणाली (सीएमआरएफ पोर्टल) एकत्रित जोडण्यात येणार आहेत. या सुविधेमुळे निधीच्या अर्जाची प्रक्रिया अधिक गतिशिल, सोपी होणार आहे. याकरीता जिल्हाधिकारी कार्यालयात "मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष” सुरु करण्यात येणार असून याबाबत शासननिर्णय जारी करण्यात आला आहे.

<><><><><>

नवी मुंबई महानगरपालिकेच्या मानक कार्यप्रणालीनुसार उपायोजना न करणाऱ्या ८७ विकासकांकडून दंडात्मक शुल्क भरण्यासाठी नोटीसा बजाविण्यात आल्या होत्या. त्या माध्यमातून  महापालिकेनं सुमारे १ कोटी ४० लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. वायू आणि ध्वनी प्रदूषणाबद्दल नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारींवर तोडगा काढण्यासाठी मानक कार्यप्रणाली तयार करण्यात आली आहे. त्यानुसार नवी मुंबई

महानगरपालिका क्षेत्रात बांधकाम चालू असलेल्या प्रकल्पांची पाहणी केली असता या ठिकाणी मानक कार्यप्रणालीचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आल्यावर ही कारवाई करण्यात आली आहे.

**<><><><><>**

लातूर जिल्ह्यातून जाणाऱ्या प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गाच्या निषेधार्थ आज लातूर इथं शेतकऱ्यांनी धरणं आंदोलन केलं. शक्तीपीठ महामार्ग हा शेतकरी विरोधी असून यामुळे लातूर जिल्ह्यातल्या ५०० हेक्टर हून अधिक बागायती शेतीचं नुकसान होईल तसंच शेकडो शेतकरी भूमिहीन होतील, असं या शेतकऱ्यांचं म्हणणं आहे.

**<><><><><>**

वर्मा हे खटल्याच्या वेळी अनुपस्थित असल्यानं न्यायालयाने त्यांच्या अटकेसाठी अजामीनपात्र वॉरंट जारी केलं आहे.  हा खटला महेशचंद्र मिश्रा यांच्या वतीनं श्री नावाच्या कंपनीनं वर्मा यांच्या कंपनीविरुद्ध कलम १३८ अंतर्गत दाखल केला होता.

**//<><><><><>//**